# <u>वसई विरार शहर महानगरपालिका</u>

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक १८/११/२०१६**

**सायं ४.३० वा.**

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१०/२०१६ रोजीचे कायम केलेले इतिवृत्त माहितीस्तव.</td><td>ठराव :-मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १९/१०/२०१६ रोजीचे कायम केलेले व माहितीसाठी प्राप्त झालेले इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहेत.<br>अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१८/११/२०१६</td><td>श्री. किरण पुरुषोत्तम भोईर</td><td>महानगरपालिकेचे ९ प्रभाग समित्यांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या प्रभारी सहा. आयुक्तांबाबत माहिती</td><td>१) मा. उपायुक्त - १ २) मा. सहा. आयुक्त, आस्थापना</td></tr>
<tr><td>१८/११/२०१६</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>पंतप्रधान आवास योजना राबविण्यासाठी महापालिकेने केलेल्या ठरावाच्या अनुषंगाने सर्वेक्षणासाठी निविदा प्रक्रिया व अनुषंगिक कार्यवाही, नेमलेले ठेकेदार व सर्वेक्षण अहवाल इ. बाबतची माहिती</td><td>१) मा. उपायुक्त - १ २) मा. श्री. पाचंगे, अभियंता, पंतप्रधान आवास योजना</td></tr>
<tr><td>१८/११/२०१६</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>महापालिकेमार्फत मे. हिरावती एंटरप्राईझेस यांना झाडे लावा, झाडे जगवा अभियांना अंतर्गत मंजुर केलेल्या ठेक्याबाबतची माहिती</td><td>१) मा.उपायुक्त, वृक्ष प्राधिकरण, उद्यान विभाग २) विभाग प्रमुख, वृक्षप्राधिकरण, उद्यान</td></tr>
<tr><td>१८/११/२०१६</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>वसई-विरार शहर महानगरपालिकेकडील १ एप्रिल २०१६ पासूनची अस्तित्वात असलेल्या स्वमालकीच्या वाहनांच्या संख्यांबाबतची माहिती</td><td>१) मा.उपायुक्त, वाहन विभाग २) विभाग प्रमुख, वाहन विभाग</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | |
| ३ | शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव | **ठराव :-**<br>१ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, न.वि. २०, मंत्रालय मुंबई - ३२ (शासन परिपत्रक)<br>२ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, न.वि. २०, मंत्रालय मुंबई - ३२ (शासन परिपत्रक)<br>३ महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, न.वि. २०, मंत्रालय मुंबई - ३२ (शासन परिपत्रक) |
| ४ | श्रीमती सुजाता शिवराम पवार यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने महापालिका सेवेत सामावुन घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:- निर्णय/ठराव:-** सदर विषयाबाबत सभागृहात साधक/ बाधक चर्चा केली. चर्चेअंती प्रस्तुत प्रकरणी पुढील महासभेत अद्यावत प्रस्ताव सादर करावा, तुर्त सदरचा प्रस्ताव तहकुब ठेवण्यांत येत आहे, यांस सभेने एकमताने मंजुरी दिली.<br>**अनुमोदक :- (प्रविण शेट्टी) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ५ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई आस्थापनेवरील स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार श्रीमती शारदा बाबु सोलंकी यांचा वारस मुलगा श्री. दिपक बाबु सोलंकी यांना लाड समिती शिफारसीनुसार महापालिका सेवेत सामावुन घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती शारदा बाबू सोलंकी या दिनांक १३/०३/२०१६ रोजी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्त झालेल्या असुन त्यांचा मुलगा श्री.दिपक बाबू सोलंकी (वय ३६ वर्षे ०३ महिने) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (नितीन राऊत) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ६ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती आय वसई आस्थापनेवरील स्वेच्छानिवृत्त सफाई कामगार श्रीमती हमरी रमेश गोहील यांचा वारस मुलगा श्री. दिनेश रमेश गोहील यांना लाड समिती शिफारसीनुसार महापालिका सेवेत सामावुन घेणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती हमरी रमेश गोहील दिनांक ०९/०३/२०१६ रोजी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्त झालेल्या असुन त्यांचा मुलगा श्री.दिनेश रमेश सोलंकी (वय २९ वर्षे ११ महिने) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (मनिषा जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| | | |

| | | |
|---|---|---|
| ७ | कुमार दिपक भगवान वाघ यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार महापालिका सेवेत सफाई कामगार पदावर सामावुन घेणेबाबत. | **निर्णय/ठरावः-** वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या प्रभाग समिती - आय, वसई येथील कर्मचारी श्रीमती लक्ष्मी भगवान वाघ दिनांक ०१/०२/२०१६ रोजी महानगरपालिका सेवेतून स्वेच्छानिवृत्त झालेल्या असुन त्यांचा मुलगा श्री.दिपक भगवान वाघ (वय २६ वर्षे ) हे सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडील शासन परिपत्रक दिनांक २१ ऑक्टोबर, २०११, शासन परिपत्रक दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ व शासन निर्णय दिनांक ११ मार्च, २०१६ मधील तरतुदीनुसार वारसहक्क नियुक्तीसाठी पात्र असल्याने त्यांना लाड समितीच्या शिफारसीनुसार वारस हक्काने महानगरपालिका सेवेत "सफाई कामगार" या पदावर सामावुन घेणेस ही महासभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ८ | वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील मयत सफाई कामगारांच्या वारसास, वारसा हक्क पध्दतीने महापालिका सेवेत सामावुन घेणेबाबत. | **निर्णय/ठरावः-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. सफाई-२०१५/प्र.क्र.२६८/ महामंडळे, दिनांक ११/०३/२०१६ नुसार लाड समितीचे शिफारसीनुसार वारसा हक्क पध्दतीने श्री. पांडुरंग काशिनाथ घरत यांच्या वारस मुलास कु. नंदकुमार पांडुरंग घरत यांस महानगरपालिकेच्या सेवेत "सफाई कामगार" या पदावर नियुक्ती देण्यास आजची ही महासभा मंजुरी देत आहे.<br>**अनुमोदक :- (रुपेश जाधव) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ९ | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सुचविल्याप्रमाणे नायगाव, जुचंद्र, बाफाणे राज्य महामार्ग क्र. ४१ रस्त्याला जोडून नव्याने २० मी. डी.पी. रस्ता व नायगाव रेल्वे स्थानकालगत रेल्वे उड्डाणपूल प्रस्तावित करणे व सदर प्रस्तावित आरक्षणाचे भूसंपादन व अंमलबजावणी करणेसाठी समुचित प्राधिकरण म्हणून वसई विरार शहर महानगरपालिका करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये केलेला प्रस्ताव मंजूरीसाठी शासनाकडे पाठविणेकामी<br>अंतिम मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय/ठरावः-** वरील प्रस्तवानुसार वसई-विरार उपप्रदेशाच्या मंजूर विकास आराखडयामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांनी सुचविल्याप्रमाणे नायगावं -जुचंद्र -बापाणे राज्य महामार्ग क्र.४१ रस्त्याला जोडुन नविन २० मी. रुंदीचा D.P रस्ता प्रस्तावित करणे तसेच नायगांव रेल्वे स्थानकालगत नविन आरक्षण रेल्वे उड्डान पुल प्रस्तावीत करणे (नकाशा क्र. VVCMC.MoD No.०४/२०१४-१५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे) तसेच सदर आरक्षणामुळे बाधित होणा-या भूधारकांना मोबदला म्हणुन हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) देणे व सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करणेस समुचीत प्राधिकरण म्हणुन वसई-विरार शहर महानगरपालिका करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करुन प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांस हि सभा मान्यता देत आहे व याकामी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- (मनिष वर्तक) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |

| | | |
|---|---|---|
| १० | वसई विरार उपप्रदेशामध्ये झोपडपट्टी पुर्नवसन योजना (SRA) लागू करणे बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये केलेल्या कार्यवाहीस शासनाची मंजूरी मिळणेकामी सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस अंतिम मान्यता मिळणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वरील प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे बृन्हमुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये ज्याप्रमाणे झोपडपट्टी पूर्नवसन योजनेची (SRA) तरतुद अंतर्भूत केलेली आहे, त्याप्रमाणे सदर झोपडपट्टी पूर्नवसन योजनेची (SRA) तरतुद अंमलबजावणी व कार्यवाही करण्यांसाठी वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या सुधारीत विकास नियंत्रण नियमावली २०१३ मधिल विनियम २० चे कलम २० मध्ये सदर झोपडपट्टी पूर्नवसन योजना (SRA) समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये केलेल्या कार्यवाहीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांस तसेच याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यांत येत आहे. याकामी उक्त अधिनियमाच्या अधिन राहुन पुढील कार्यवाही करणेंत यावी.<br>**अनुमोदक :- (निलेश देशमुख) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| ११ | प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील गटारावर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यावर विविध व्यासाची फायबर झाकणे पुरविणे व बसविणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यता देवून ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील तीन वर्षाकरीत (बी-२ निविदादर) मागविणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती A, B, C, D, E, F, G, H, I मधील गटारावर, फुटपाथवर व मुख्य रस्त्यावर विविध व्यासाची फायबर झाकणे पुरविणे व बसविणे कामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून ई-निविदा कार्यप्रणालीद्वारे पुढील ३ वर्षाकरीता ई-निविदा दर मागविण्यात यावेत, असे ही सभा ठरविते आहे.<br>**अनुमोदक :- (रमेश घोरकना) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |
| १२ | वसई तालुका कला-क्रीडा महोत्सव २०१६ साठी अनुदान देणेबाबत. | **निर्णय/ठराव:-** सादर केलेल्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करण्यांत आली वसई तालुका कला क्रिडा विकास मंडळाच्या माध्यमातुन सन २०१६ मध्ये आयोजित केलेल्या २७ व्या वसई तालुका कला-क्रिडा महोत्सवाचे आयोजनासाठी, वसई तालुका कला-क्रिडा विकास मंडळ या संस्थेस र. रु. ४०,००,०००/- (अक्षरी रक्कम रु. चाळीस लक्ष मात्र) अदा करण्यात आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करीत आहे.<br>**अनुमोदक :- (पंकज ठाकूर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)** |

| | | |
|---|---|---|
| १३ | सभा सुचना क्र. ०९, दिनांक १८/११/२०१६ ची पुरक विषय पत्रिका क्रमांक - एक<br>विषय क्र. १३) वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या आय.सी.यु., डायलेसिस व सोनोग्राफी इ. विभागाचे रुग्णांकडून घ्यावयाचे व मानद डॉक्टरांना द्यावयाचे दर हे नव्याने निश्चित करणेस मान्यता मिळणेबाबत. | <u>ठराव / निर्णय :-</u> वसई विरार शहर महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या आय.सी.यु, डायलेसिस व सोनोग्राफी इ. विभागाचे रुग्णांकडुन घ्यावयाचे व मानद डॉक्टरांना दयावयाचे दर हे नव्याने निश्चित करणेस मान्यता मिळणेबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या विजयनगर तुळींज रुग्णालयात नव्याने सुरु करण्यात येणाऱ्या आय.सी.यु विभागासाठी आवश्यक बाबींची रुग्णांकडुन घ्यावयाच्या व मानद डॉक्टरांना दयावयाच्या दरांची निश्चिती खालीलप्रमाणे करणेस ही सभा मंजुरी देत आहे. |

| आय.सी.यु विभागातील विविध बाबींची नावे | महानगरपालिकेच्या रुग्णालयात रुग्णाकडुन घ्यावयाचे दर | महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद डॉक्टरांना दयावयाचे दर |
|---|---|---|
| बेड चार्ज प्रति दिवस (प्रति रुग्ण) | रु.१००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | - |
| व्हेंटिलेटर चार्ज प्रति दिवस (प्रति रुग्ण) (ऑक्सिजन सह) | रु.२००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | - |
| सी - पॅप चार्ज प्रति दिवस (प्रति रुग्ण) | रु.२००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | - |
| बाय-पॅप चार्ज प्रति दिवस (प्रति रुग्ण) | रु.२००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | - |
| डॉक्टर व्हिजीट फी (प्रति व्हिजीट) (प्रति रुग्ण) | रु.२००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | रु.२००.०० |
| ऑक्सिजन चार्जेस प्रति दिन | रु.१००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | - |

| | | |
|---|---|---|
| मॉनिटर चार्जेस प्रति दिवस (प्रति रुग्ण) | रु.१००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | - |

तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात नव्याने सुरु करण्यात आलेल्या डायलेसिस विभागाकरिता आवश्यक बाबींची रुग्णांकडुन घ्यावयाच्या व मानद डॉक्टरांना दयावयाच्या दरांची दरनिश्चिती खालीलप्रमाणे करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

| डायलेसिस विभाग | महानगरपालिकेच्या महिला बाल कल्याण समिती कडुन खाजगी रुग्णालयातील रुग्णांना देण्यात येणारे अनुदान (प्रति रुग्ण प्रति खेप) | रुग्णांकडुन घ्यावयाचे दर (प्रति रुग्ण प्रति खेप) | मानद डॉक्टरांना दयावयाचे दर (प्रति रुग्ण प्रति खेप) |
|---|---|---|---|
| बेड चार्ज व सेवेचा दर प्रती खेप (प्रति रुग्ण) | रु.३५०.०० | रु.३५०.०० | रु.२००.०० |

महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या सोनोग्राफी विभागाकरिता आवश्यक बाबींची प्रति रुग्णांकडुन घ्यावयाच्या व मानद डॉक्टरांना दयावयाच्या दरांची दरनिश्चिती खालीलप्रमाणे करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

| सोनोग्राफी विभागातील विविध बाबींची नावे | रुग्णाकडुन घ्यावयाचे दर (प्रति रुग्ण) | मानद डॉक्टरांना दयावयाचे दर (प्रति रुग्ण) |
|---|---|---|
| व्हिनस / आरट्रिअल U/L | रु.१०००.०० | रु.७००.०० |
| व्हिनस / आरट्रिअल B/L | रु.२०००.०० | रु.१४००.०० |
| रिनल ड्रॉप्लर व्हिनस व आरट्रिअल बी/एल<br>Renal Doppler Venous and Arterial B/L | रु.१०००.०० | रु.७००.०० |
| कॅरोटिड ड्रॉप्लर बी/ एल<br>Carotid Doppler B/L | रु.१०००.०० | रु.७००.०० |
| यु एस जी गाईडेड प्युल्युरल फ्लुड टॅपिंग (डायग्नोस्टिक)/(थेरॅपेटिक)<br>USG guided pleural fluid Tapping | रु.८००.०० | रु.५००.०० |

| | | |
|---|---|---|
| (Diagnostic/ Therapeutic) | | |
| यु एस जी गाईडेड आरट्रिअल फ्लुड टॅपिंग (डायग्नोस्टिक)/(थेरॅपेटिक)<br>USG quided Ascitic fluid Tapping (diagnostic)/(Therapeutic) | रु.८००.०० | रु.५००.०० |
| यु एस जी गाईडेड पिग टेलिंग<br>USG quided Pig Tailling | रु.२०००.०० | रु.१२००.०० |
| कलर डॉपलर (Color Doppler) | रु.१०००.००<br>(जननी शिशू सुरक्षा योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मोफत) | रु.५००.०० |
| २ डी ईको (2 D-Echo) | रु.८००.०० | रु.५००.०० |

**महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या ओर्थोपेडिक विभागाकरिता आवश्यक बाबींची प्रति रुग्णांकडुन घ्यावयाच्या व मानद डॉक्टरांना दयावयाच्या दरांची दरनिश्चिती खालीलप्रमाणे करणेस ही सभा मंजुरी देत आहे.**

| | **महानगरपालिकेच्या रुग्णालयात रुग्णाकडुन घ्यावयाचे दर** | **महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद डॉक्टरांना दयावयाचे दर** |
|---|---|---|
| प्लास्टरींग चार्जेस - साहित्यासह | रु.६००.०० | रु.२००.०० |
| प्लास्टरींग चार्जेस - बिगर साहित्यासह | रु.३००.०० | रु.२००.०० |

**महानगरपालिकेच्या रुग्णालयाच्या आवश्यक बाबींची प्रति रुग्णांकडुन घ्यावयाच्या व मानद डॉक्टरांना दयावयाच्या दरांची दरनिश्चिती खालीलप्रमाणे करणेस ही सभा मंजुरी देत आहे.**

| | **महानगरपालिकेच्या रुग्णालयात रुग्णाकडुन घ्यावयाचे दर** | **महानगरपालिकेच्या रुग्णालयात मानद डॉक्टरांना दयावयाचे दर** |
|---|---|---|
| एफ एन अे सी (F.N.A.C) | रु.५००.०० | रु.३००.०० |

| | | |
|---|---|---|
| पॅप स्मिअर (Pap smear) | रु.३००.०० | रु.१५०.०० |

वरीलप्रमाणे नमुद केलेल्या सेवांचे नव्याने दर निश्चित करणेकरीता ही सभा मंजुरी देत असुन याकरीता येणाऱ्या संपूर्ण खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे. तसेच महानगरपालिकेकडे उपलब्ध नसलेली औषधे, साहित्य व प्रयोगशाळा तपासण्या या रुग्णांनी स्वखर्चाने करणेस ही सभा मान्यता देत आहे.

**अनुमोदक :- (सुनिल आचोळकर) सुचक :- (फ्रान्सिस डिसोजा (आपटे)**